पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
सर्व भारतीयांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ३० वा | शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# पीकविमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक ?

## प्रीमियम कोट्यवधींचा; भरपाई मात्र तुटपुंजी! लाखो शेतकरी विम्याच्या लाभापासून वंचित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** नैसर्गिक आपत्तीने पिके उद्ध्वस्त झाल्यानंतर शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने राबविण्यात येणारी पीकविमा योजना आता नेमकी शेतकऱ्यांच्या हिताची आहे की विमा कंपन्यांच्या फायद्याची, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकरी, केंद्र व राज्य सरकारकडून विमा कंपन्यांकडे कोट्यवधी रुपयांचा विमा हप्ता जमा होत असताना प्रत्यक्ष नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या हातात मात्र तुलनेने अत्यल्प भरपाई पडत असल्याचे विविध जिल्ह्यांतील आकडेवारीवरून समोर येत आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांची उपलब्ध आकडेवारी पाहिली तरी विमा योजनेतील हा विरोधाभास ठळकपणे समोर येतो. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ₹१२८ कोटी ५६ लाखांचा विमा हप्ता जमा झाला; मात्र शेतकऱ्यांना ₹७ कोटी ९९ लाखांचीच भरपाई मिळाली. जालना जिल्ह्यात ₹३ कोटी १५ लाख मंजूर झाले असून त्यापैकी ₹१ कोटी ९२ लाखांचे वाटप झाले. लातूरमध्ये शेतकऱ्यांनी ₹१२१ कोटी ५४ लाखांचा विमा हप्ता भरला, तर केवळ ₹१९.७६ कोटींची भरपाई मिळाली.

परभणी जिल्ह्यात तर ₹३०६ कोटी ३७ लाखांचा विमा हप्ता जमा झाला. त्यापैकी ₹१०२ कोटी ३४ लाखांची नुकसानभरपाई मंजूर झाली असून ₹९८ कोटी ८९ लाखांचे वाटप करण्यात आले. हिंगोलीत ₹१५० कोटी ३२ लाखांचा विमा हप्ता जमा झाला असताना ₹१२२ कोटी ४५ लाख मंजूर झाले आणि त्यापैकी ₹९८ कोटी १ लाखांचे वाटप झाले. ही आकडेवारी कृषी विभागाकडून उपलब्ध झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

**सोलापुरातही चित्र वेगळे नाही!**

मराठवाड्याप्रमाणेच सोलापूर जिल्ह्यातही पीकविमा योजनेबाबत शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. २०२५ च्या खरीप हंगामात सोलापूर जिल्ह्यात विमा कंपनीकडे तब्बल ₹१५३ कोटी १९ लाखांचा विमा हप्ता जमा झाला. मात्र, जिल्ह्यासाठी मंजूर झालेली नुकसानभरपाई ₹४१ कोटी ४६ लाख इतकीच आहे. या भरपाईचा लाभ ४२ हजार ७९७ शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीवर आधारित वृत्तातून समोर आले आहे. म्हणजेच विमा कंपनीकडे जमा झालेल्या हप्त्याच्या तुलनेत मंजूर भरपाईची रक्कम मोठ्या प्रमाणात कमी आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची. २०२५ च्या खरीप हंगामात जिल्ह्यात तब्बल १ लाख ३६ हजार हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली होती. अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे सोयाबीनचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी पीक हातातून गेले; मात्र पीक कापणी प्रयोग आणि बदललेल्या निकषांमुळे सोयाबीनला अपेक्षित नुकसानभरपाई मिळाली नसल्याचे वृत्त आहे.

दुसरीकडे कांदा उत्पादकांना तुलनेने मोठी भरपाई मंजूर झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील ४२,७९७ पात्र शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेल्या ₹४१ कोटी ४६ लाखांपैकी ₹२९ कोटी ६६ लाख रुपये २०,५६९ कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मंजूर झाले आहेत. मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, माळशिरस आणि माढा तालुक्यांतील कांदा उत्पादकांना त्याचा लाभ मिळणार आहे.

**पूर्वीही सोलापूरच्या शेतकऱ्यांना प्रतीक्षाच**

सोलापूर जिल्ह्यात पीकविमा



भरपाईचा खोळंबा हा नवीन विषय नाही. २०२४ मध्ये जिल्ह्यातील ३२ हजार ७६० शेतकऱ्यांची सुमारे ₹१०.५० कोटींची अग्रिम भरपाई बँक खात्याशी आधार जोडणी अथवा तांत्रिक अडचणींमुळे अडकली होती. त्यात सोयाबीन, बाजरी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांचा समावेश होता.

तसेच २०२४ च्या खरीप व रब्बी हंगामातील नुकसानभरपाईसाठी सोलापूर जिल्ह्यातील ६५ हजार ६२० शेतकऱ्यांना ₹८९ कोटी ८५ लाख वितरित करण्याची प्रक्रिया करण्यात आली होती. यामध्ये खरीप हंगामातील ४८,९३९ आणि रब्बीतील १६,६८१ शेतकरी पात्र ठरले होते.

**प्रीमियम भरताना शेतकरी पुढे; भरपाईच्या वेळी निकषांची भिंत!**

पीकविमा योजनेचे सर्वात मोठे गूढ म्हणजे विमा भरताना शेतकऱ्याला आपल्या पिकाचा विमा सहज उपलब्ध होतो; मात्र नुकसान झाल्यानंतर भरपाई मिळवताना विविध तांत्रिक निकष, अधिसूचना, पीक कापणी प्रयोग, उंबरठा उत्पादन आणि मंडळनिहाय पात्रता यांचा आधार घेतला जातो. परिणामी प्रत्यक्ष शेतात मोठे नुकसान होऊनही अनेक शेतकरी विमा भरपाईपासून वंचित राहतात.

सोलापूर जिल्ह्यातील २०२५ च्या खरीप हंगामातही बदललेले निकष आणि पीक कापणी प्रयोगाचा फटका बसल्याचे समोर आले आहे. विशेषतः सोयाबीन उत्पादकांच्या नुकसानीचा मुद्दा यामुळे ऐरणीवर आला आहे.

**मग विमा योजनेचा फायदा नेमका कुणाला ?**


शेतकरी पेरणीपूर्वीच उत्पादन खर्चासाठी कर्ज काढतो. बियाणे, खते, औषधे, मशागत, मजुरी यावर मोठा खर्च करतो. त्यानंतर नैसर्गिक संकटांपासून संरक्षण मिळावे म्हणून पीकविमाही भरतो. मात्र, प्रत्यक्ष संकट आल्यानंतर नुकसानभरपाईसाठी त्याला कागदपत्रे, पंचनामे, ऑनलाइन पूर्वसूचना, पीक कापणी प्रयोग आणि विविध निकषांच्या प्रक्रियेतून जावे लागते. एकीकडे शेतकऱ्यांनी भरलेला हिस्सा, तर दुसरीकडे केंद्र व राज्य सरकारकडून विमा कंपन्यांना मिळणारा हिस्सा असा मोठा निधी कंपन्यांकडे जमा होत असताना नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पदरी अपेक्षेपेक्षा कमी भरपाई पडत असेल, तर या संपूर्ण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

**सरकारने विमा कंपन्यांचा लेखाजोखा जाहीर करावा**

पीकविमा योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात शेतकरी, राज्य सरकार आणि केंद्र सरकारने किती रक्कम विमा कंपनीकडे जमा केली, त्यापैकी कंपनीने किती रक्कम नुकसानभरपाई म्हणून मंजूर केली, किती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष वाटप झाले आणि किती रक्कम अद्याप प्रलंबित आहे, याचा जिल्हानिहाय आणि पिकनिहाय लेखाजोखा सरकारने सार्वजनिक करणे गरजेचे आहे.

नुकसान झालेले असूनही केवळ तांत्रिक अथवा प्रशासकीय निकषांमुळे शेतकरी भरपाईपासून वंचित राहत असेल तर त्या निकषांचा फेरविचार करण्याचीही गरज आहे. अन्यथा 'शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी असलेली पीकविमा योजना विमा कंपन्यांच्या नफ्यासाठी तर नाही ना?' हा प्रश्न अधिक तीव्र होत जाणार आहे.

सोलापूरसह राज्यातील शेतकरी आता केवळ विमा भरपाईची वाट पाहत नसून, विमा कंपन्यांकडे जमा होणाऱ्या हजारो कोटींच्या निधीचा आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांना मिळणाऱ्या नुकसानभरपाईचा हिशेब पारदर्शकपणे जाहीर करण्याची मागणी करत आहेत. पीकविमा योजनेवरील शेतकऱ्यांचा विश्वास टिकवायचा असेल, तर सरकारने या संपूर्ण व्यवस्थेचा गांभीर्याने आढावा घेणे अपरिहार्य आहे.















## संपादकीय

# महामार्गांवर सुरक्षा

राष्ट्रीय महामार्गाच्या 'राइट ऑफ वे' क्षेत्रात कोणतेही नवीन ढाबे, हॉटेल किंवा खाद्यपदार्थ विक्री केंद्रे त्याचप्रमाणे व्यावसायिक बांधकाम सुरू करणे अथवा चालविणे तत्काळ प्रभावाने बंद करण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्गांवरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने हे निर्देश दिले आहेत. महामार्गांवरून प्रवास करताना रस्त्याच्या दुतर्फा दिसणारे चकचकीत ढाबे, रात्रीच्या अंधारात उजळणारे त्यांचे लखलखते फलक आणि त्याच ठिकाणी बहुतेक वेळा अस्ताव्यस्त उभ्या असलेल्या अवजड वाहनांचा ताफा हे चित्र आता सगळीकडेच दिसते. ती एक संस्कृतीच विकसित झाली आहे पण; याच ढाबा संस्कृतीने आपल्या महामार्गांना एका वेगळ्याच अपघात संकटाच्या खाईत लोटले आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. महाराष्ट्र सरकारनेही अलीकडेच राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना राष्ट्रीय महामार्गाच्या 'राइट ऑफ वे' क्षेत्रातील सर्व अनधिकृत बांधकामे 60 दिवसांत हटवण्याचे आदेश दिले आहेत. वरवर पाहता ही केवळ एक प्रशासकीय किंवा अतिक्रमण हटाव मोहीम वाटू शकते; पण तिच्या मुळाशी गेल्यावर लक्षात येते की, ही बाब राज्यातील किंवा देशातील सर्वच रस्त्यांवरील मानवी प्राणांच्या सुरक्षेशी संबंधित आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबर 2025 मध्ये राजस्थानमधील फलोदी जिल्ह्यात झालेला भीषण अपघात आजही अंगावर शहारे आणणारा आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या एका ढाब्याबाहेर बेकायदेशीरपणे पार्क केलेल्या ट्रकला एका टेम्पोने धडक दिली आणि 15 निष्पाप जीवांचा बळी गेला. या एका घटनेने संपूर्ण देशाचे लक्ष महामार्गालगत होर्णाया अनियंत्रित आणि बेकायदेशीर अतिक्रमणांकडे वेधले. सर्वोच्च न्यायालयाने या अपघाताची गंभीर दखल घेत 13 एप्रिल 2026 रोजी ऐतिहासिक निर्देश दिले. न्यायालयाने स्पष्ट केले की, महामार्ग हे केवळ वाहने पळवण्यासाठी नसून ते सुरक्षित प्रवासाचे मार्ग असले पाहिजेत. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या नगर विकास विभागाने कंबर कसली व महामार्गालगतच्या राइट ऑफ वे क्षेत्रातील अतिक्रमणांवर हातोडा मारण्याचा निर्णय घेतला आहे. सगळ्यांत प्रथम राइट ऑफ वे या संकल्पनेचे गांभीर्य समजून घेणे आवश्यक आहे. सामान्यांच्या मते, डांबरी किंवा सिमेंटचा रस्ता म्हणजे महामार्ग. पण तांत्रिकदृष्ट्या, रस्त्याच्या दोन्ही बाजूंची मोकळी जमीन, ड्रेनेज व्यवस्था, कडेचे भराव आणि भविष्यातील विस्तारीकरणासाठी राखीव ठेवलेली जागा या सगळ्याचा समावेश राइट ऑफ वे मध्ये होतो असे स्पष्ट केले गेले आहे. दुर्दैवाने, याच राखीव जमिनीवर तात्पुरत्या टपऱ्यांपासून ते आलिशान हॉटेल्स आणि ढाब्यांपर्यंतचे डोलारे उभे राहिले आहेत. एखादे हॉटेल रस्त्याच्या कडेला दिसते, पण तांत्रिकदृष्ट्या ते महामार्गालगत जी मोकळी जागा असणे आवश्यक आहे तीच रोखून बसलेले असते. या अनधिकृत बांधकामांमुळे रस्त्यावरून वेगाने धावणाऱ्या गाड्या आणि या ढाबे अथवा हॉटेल्समधून अचानक मुख्य रस्त्यावर येणारी वाहने यांच्यात रोज अनपेक्षित जीवघेणे संघर्ष होतात.सर्वोच्च न्यायालयाचे आणि राज्य सरकारचे हे नवे धोरण म्हणजे सरसकट सर्व हॉटेल्स किंवा ढाबे पाडण्याचा सरसकट वरवंटा नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे. ज्यांच्याकडे कायदेशीर परवानग्या आहेत, ज्यांनी महामार्ग प्राधिकरणाचे नियम पाळले आहेत, त्यांना घाबरण्याचे कारण नाही. मात्र, यापुढे महामार्गाच्या मध्यबिंदूपासून 40 मीटरच्या आत निवासी आणि 75 मीटरच्या आत व्यावसायिक वापरासाठी जमीन वापर बदलण्यास पूर्णपणे बंदी असेल.तसेच, एनएचएआय किंवा पीडब्लूडीच्या ना हरकत प्रमाणपत्राशिवाय कोणत्याही स्थानिक संस्थेला नवीन परवाने देता येणार नाहीत. आधीच दिलेल्या परवान्यांचा 30 दिवसांत फेरआढावा घेतला जाणार आहे. या संपूर्ण अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हाधिर्कायांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा महामार्ग सुरक्षा टास्क फोर्सवर सोपवण्यात आली आहे. कागदावर हे धोरण जितके स्पष्ट आणि कठोर दिसते, तितकीच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी हे एक मोठे आव्हान असणार आहे. कारण आपल्याकडे कायदे बनवणे सोपे असते, पण स्थानिक राजकीय दबाव, भ्रष्टाचार आणि प्रशासकीय सुस्तपणा यामुळे अशा मोहिमा अनेकदा गुंडाळल्या जातात. 60 दिवसांची दिलेली मुदत खरोखरच पाळली जाणार की ही मोहीमही केवळ एक कागदी घोडा ठरणार, हा खरा प्रश्न आहे. दुसरीकडे, या निर्णयाचे सामाजिक व आर्थिक पैलूही नाकारता येत नाहीत. हजारो लोकांचा रोजगार या ढाब्यांवर आणि महामार्गावरील व्यवसायांवर अवलंबून आहे. रात्रीच्या वेळी हजारो किलोमीटरचा टप्पा पार करणाऱ्या ट्रक चालकांसाठी तसेच सर्वसामान्य प्रवाशांसाठीही हे ढाबे म्हणजे केवळ जेवणाची जागा नसून सोयीचे एकमेव ठिकाण असतात. जर कडक कारवाईमुळे हे ढाबे बंद झाले, तर ट्रक व अन्य वाहने कुठे पार्क होणार? चालकांनी विश्रांती कुठे घ्यायची? प्रवशांनी स्वच्छतागृहे आणि अन्य सुविधांचा वापर कुठे करायचा? जर त्याचा विचार केला नाही तर चालकांचा थकवा आणि डुलकीमुळे होर्णाया अपघातांचे प्रमाण आणखी वाढू शकते. म्हणूनच, केवळ अतिक्रमणे हटवून भागणार नाही; तर सरकारने बाह्यरस्त्यांच्या लगत अधिकृत, सुरक्षित सुविधा उभारण्यावर भर दिला पाहिजे, जिथे वाहनांसाठी प्रशस्त पार्किंग आणि प्रवाशांसाठी सुरक्षित उपाहारगृहे असतील. रस्ता सुरक्षा ही केवळ दंडात्मक कारवाईने साध्य होत नसते. समतोल साधणे ही काळाची गरज आहे.

महामार्ग हे प्रवासाचा अवधी कमी करण्यासाठी उपयुक्त आहेत आणि त्यांना तसेच ठेवले पाहिजे. 60 दिवसांची ही अतिक्रमण हटाव मोहीम जर प्रामाणिकपणे राबवली गेली, तर महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्ग केवळ अधिक रुंद होणार नाहीत, तर ते खऱ्या अर्थाने सुरक्षित आणि मानवी प्राणांची किंमत जपणारे ठरतील.

# भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये

१५ ऑगस्ट हा प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्राभिमान, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना जागविणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने ब्रिटिशांच्या दीर्घकालीन वसाहतवादी राजवटीतून स्वातंत्र्य प्राप्त केले आणि एका स्वतंत्र राष्ट्राच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला. या दिवसाचे महत्त्व केवळ ध्वजारोहण, राष्ट्रगीत, देशभक्तिपर गीते आणि विविध कार्यक्रमांपुरते मर्यादित नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या मागे अनेक पिढ्यांचा संघर्ष, असंख्य ज्ञात–अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि कोट्यवधी भारतीयांच्या स्वराज्याच्या आकांक्षेची प्रेरणा आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा इतिहासाचे स्मरण करण्याचा दिवस तर आहेच; पण त्याचबरोबर स्वातंत्र्याचा अर्थ समजून घेण्याचा, संविधानिक मूल्यांचे महत्त्व जाणून घेण्याचा आणि स्वतंत्र भारताच्या भविष्यासाठी आपली जबाबदारी निश्चित करण्याचा दिवस आहे.

भारताला मिळालेले स्वातंत्र्य सहजासहजी प्राप्त झालेले नव्हते. ब्रिटिश सत्तेच्या काळात भारतीयांना अनेक प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागले. या परिस्थितीत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष वाढत गेला. स्वराज्य आणि स्वाभिमानाची भावना भारतीय समाजात दृढ होत गेली. १८५७ चा उठाव हा ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संघर्षातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

पुढील काळात भारतीय राष्ट्रीय चळवळीला संघटित स्वरूप प्राप्त झाले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर भारतीयांच्या राजकीय हक्कांसाठी संघर्ष केला. स्वदेशी आणि बहिष्काराच्या चळवळीने भारतीयांमध्ये आत्मनिर्भरतेची भावना निर्माण केली. या काळात सामाजिक सुधारणांच्या चळवळींनेही राष्ट्रनिर्मितीला महत्त्वपूर्ण आधार दिला. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण, स्त्रीमुक्ती आणि सामाजिक समतेसाठी केलेले कार्य भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरले. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि शिक्षणासाठी केलेले कार्य तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समानता आणि मानवी प्रतिष्ठेसाठी केलेला संघर्ष यामुळे स्वातंत्र्याची संकल्पना केवळ परकीय सत्तेपासून मुक्तीपुरती राहिली नाही, तर सामाजिक न्यायाशीही जोडली गेली.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून गांधीजींनी सामान्य नागरिकांना स्वातंत्र्याच्या संघर्षात सहभागी करून घेतले. असहकार आंदोलन, मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलन या विविध टप्प्यांतून ब्रिटिश सत्तेला भारतीय जनतेच्या सामूहिक शक्तीची जाणीव झाली.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांचे योगदानही अविस्मरणीय आहे. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद आणि असंख्य क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले. महिलांनीही या संघर्षात मोठ्या धैर्याने सहभाग घेतला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याची गाथा ही संपूर्ण समाजाच्या सामूहिक संघर्षाची गाथा आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; परंतु स्वातंत्र्याबरोबर फाळणीची शोकांतिका देशाच्या वाट्याला आली. भारत आणि पाकिस्तान अशी विभागणी झाली आणि मोठ्या प्रमाणावर हिंसाचार व विस्थापन झाले. स्वातंत्र्याचा आनंद आणि फाळणीचे दुःख या दोन्हींच्या छायेत स्वतंत्र भारताचा जन्म झाला. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा आनंदाचा दिवस असला तरी तो राष्ट्रीय एकात्मता, बंधुता आणि सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारीही आपल्याला स्मरवून देतो.

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर राष्ट्रनिर्मितीची मोठी आव्हाने होती. गरिबी, अशिक्षितता, बेरोजगारी, आरोग्याच्या समस्या आणि आर्थिक मागासलेपण यांवर मात करणे आवश्यक होते. या परिस्थितीत भारताने लोकशाहीचा मार्ग स्वीकारला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले आणि भारत प्रजासत्ताक बनला. संविधान हे स्वतंत्र भारताच्या राष्ट्रजीवनाचे मूलभूत अधिष्ठान ठरले. संविधानाच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. ही मूल्ये केवळ संविधानातील शब्द नाहीत; ती भारतीय लोकशाहीच्या यशाची मूलभूत तत्त्वे आहेत.

'न्याय' हे संविधानिक मूल्य भारतीय राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे ध्येय आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाशिवाय स्वातंत्र्याला पूर्ण अर्थ प्राप्त होत नाही. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना समान संधी उपलब्ध करून देणे, भेदभाव दूर करणे आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी देणे ही न्यायाची खरी कसोटी आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने कायदे आणि धोरणांच्या माध्यमातून सामाजिक न्यायाच्या दिशेने अनेक पावले उचलली आहेत. मात्र सामाजिक विषमता पूर्णपणे नाहीशी करण्यासाठी संविधानिक मूल्यांचे आचरण समाजाच्या प्रत्येक स्तरावर होणे आवश्यक आहे.

'स्वातंत्र्य' हे भारतीय संविधानाचे आणखी एक महत्त्वाचे मूल्य आहे. विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य नागरिकांना देण्यात आले आहे. परंतु स्वातंत्र्याचा अर्थ मनमानी नव्हे. आपल्या स्वातंत्र्याचा वापर करताना इतरांच्या अधिकारांचा आणि प्रतिष्ठेचा आदर करणे आवश्यक आहे. आजच्या सामाजिक माध्यमांच्या युगात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे. खोटी माहिती, अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि समाजात तेढ निर्माण करणारा मजकूर यामुळे लोकशाही आणि सामाजिक सलोख्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे स्वातंत्र्यासोबत विवेक आणि जबाबदारी आवश्यक आहे.

'समता' हे संविधानिक मूल्य भारतीय समाजासाठी विशेष महत्त्वाचे आहे. जात, धर्म, लिंग किंवा इतर कोणत्याही आधारावर भेदभाव होऊ नये, ही संविधानाची स्पष्ट भूमिका आहे. भारतीय समाजाच्या इतिहासात जातीय विषमता आणि सामाजिक भेदभावाची मोठी परंपरा राहिली आहे. त्यामुळे संविधानाने कायदेशीर समानतेबरोबर सामाजिक न्यायालाही महत्त्व दिले. आज कायद्याच्या दृष्टीने समानता प्रस्थापित झाली असली तरी सामाजिक व्यवहारात समानता पूर्णपणे रुजविण्याचे काम अद्याप बाकी आहे. स्त्री–पुरुष समानता, जातीय भेदभावाचा अंत आणि वंचित घटकांना समान संधी यांसाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

'बंधुता' हे भारतीय संविधानातील अत्यंत सुंदर आणि आवश्यक मूल्य आहे. भारताची विविधता ही त्याची मोठी ताकद आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ आणि संस्कृती असूनही भारतीय समाज एका राष्ट्रीय भावनेने जोडलेला आहे. ही एकता टिकविण्यासाठी परस्पर आदर, सहिष्णुता आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव आवश्यक आहे. मतभेद असणे हे लोकशाहीचे लक्षण आहे; मात्र मतभेदांचे रूपांतर वैरात होऊ नये. दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, विविधतेचा स्वीकार करणे आणि सामाजिक सलोखा जपणे ही बंधुतेची खरी भावना आहे.

भारतीय लोकशाहीचे यश हे संविधानिक मूल्यांच्या प्रत्यक्ष आचरणावर अवलंबून आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणूक आणि मतदान नव्हे. नागरिकांचा सहभाग, प्रश्न विचारण्याचा अधिकार, सत्तेवर नियंत्रण, कायद्याचे राज्य आणि विरोधी मतांचा आदर हे लोकशाहीचे महत्त्वाचे घटक आहेत. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा आधार असला तरी सुजाणपणे मतदान करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. जात, धर्म, पैसा किंवा क्षणिक भावनांपेक्षा सार्वजनिक हिताचा विचार करून मतदान करणारा नागरिक लोकशाही अधिक मजबूत करतो.

संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार दिले असले तरी मूलभूत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे. संविधानाचा आदर करणे, राष्ट्रीय एकता आणि अखंडता जपणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे ही नागरिकांची कर्तव्ये आहेत. आज स्वातंत्र्यदिन साजरा करताना अधिकारांसोबत कर्तव्यांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. अधिकारांचा आग्रह धरणाऱ्या नागरिकांनी आपल्या कर्तव्यांपासून दूर राहणे ही लोकशाहीसाठी योग्य बाब नाही.

शिक्षण हे संविधानिक मूल्ये रुजविण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या अधिकारांची जाणीव होते, विवेक विकसित होतो आणि सामाजिक प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची क्षमता प्राप्त होते. शाळा आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी तयार न करता संविधान, लोकशाही, समानता, बंधुता



आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे संस्कार दिले पाहिजेत. प्रश्न विचारणारा, विचार करणारा, विविध मतांचा आदर करणारा आणि सामाजिक जबाबदारी स्वीकारणारा विद्यार्थी हा भविष्यातील सक्षम नागरिक ठरतो.

आजच्या भारतात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यलढ्यातील युवकांनी देशासाठी बलिदान दिले. आजच्या युवकांनी ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान द्यावे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि नवउद्योजकता यांसारख्या क्षेत्रांत युवकांसमोर मोठ्या संधी आहेत. मात्र तंत्रज्ञानासोबत विवेक, नैतिकता आणि सामाजिक संवेदनशीलता असणेही आवश्यक आहे. राष्ट्राचे भविष्य केवळ तंत्रज्ञानाच्या प्रगतीत नसून सक्षम आणि जबाबदार नागरिक घडविण्यात आहे.

महिलांचे सक्षमीकरण हे संविधानिक समतेचे महत्त्वाचे प्रतीक आहे. महिलांनी शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग, क्रीडा, संरक्षण आणि राजकारण या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तरीही महिलांवरील हिंसा, भेदभाव, असमान संधी आणि आर्थिक परावलंबित्व यांसारखे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. स्त्रीला समान प्रतिष्ठा, समान संधी आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही आधुनिक भारताची गरज आहे. घरापासून कार्यक्षेत्रापर्यंत समानतेची संस्कृती रुजविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

ग्रामीण भारत आणि शेतकरी हे देशाच्या विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. शेती, ग्रामीण रोजगार, जलसंधारण आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणाशिवाय भारताचा सर्वांगीण विकास शक्य नाही. हवामान बदल, पाण्याची कमतरता, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यांसारखी आव्हाने शेतकऱ्यांसमोर आहेत. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि तंत्रज्ञानाच्या समान संधी निर्माण करणे हे सामाजिक न्यायाचेच एक रूप आहे. विकासाची फळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली तरच स्वातंत्र्याचा अर्थ अधिक व्यापक होईल.

पर्यावरणसंवर्धन हे आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे नागरिक कर्तव्य आहे. पाणी, हवा, जंगल आणि जैवविविधता यांचे संरक्षण केवळ वर्तमानासाठी नव्हे तर भावी पिढ्यांसाठी आवश्यक आहे. पाण्याची बचत, वृक्षसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि सार्वजनिक परिसराची स्वच्छता यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान दिले पाहिजे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन साधणे ही आजच्या राष्ट्रनिर्मितीची गरज आहे. निसर्गाचा ऱ्हास करून साधलेला विकास दीर्घकाळ टिकणारा ठरू शकत नाही.

आज भारत विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती आणि डिजिटल क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करीत आहे. या प्रगतीचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानामुळे सुविधा वाढत असल्या तरी डिजिटल दरीही लक्षात घेतली पाहिजे. ग्रामीण आणि वंचित समाजघटकांना डिजिटल साधनांची उपलब्धता, माहिती आणि कौशल्ये मिळाली तर तंत्रज्ञान सामाजिक सक्षमीकरणाचे प्रभावी साधन बनू शकते. देशभक्तीचा अर्थही आज नव्याने समजून घेण्याची गरज आहे. देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंग्याला सलाम करणे किंवा घोषवाक्ये देणे नव्हे. आपल्या कामात प्रामाणिक राहणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरण जपणे, गरजू व्यक्तीला मदत करणे आणि सामाजिक भेदभावाला विरोध करणे हीदेखील देशभक्तीचीच रूपे आहेत. सीमांचे रक्षण करणारा सैनिक जसा राष्ट्रसेवा करतो, त्याचप्रमाणे प्रामाणिकपणे काम करणारा शिक्षक, शेतकरी, वैज्ञानिक, डॉक्टर, कामगार आणि प्रत्येक जबाबदार नागरिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देत असतो.

भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये यांचा संबंध अतूट आहे. स्वातंत्र्यलढ्याने भारताला परकीय सत्तेपासून मुक्त केले, तर संविधानाने त्या स्वातंत्र्याला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची दिशा दिली. स्वातंत्र्याने आपल्याला स्वतःचे शासन करण्याचा अधिकार दिला; संविधानाने त्या शासनाची लोकशाही चौकट निश्चित केली. स्वातंत्र्याने राष्ट्रीय अस्मिता निर्माण केली; संविधानाने प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेला समान स्थान दिले. म्हणूनच स्वातंत्र्यदिनाचा खरा उत्सव हा संविधानिक मूल्यांचा सन्मान आणि त्यांच्या आचरणातूनच पूर्ण होतो.

आज भारत स्वातंत्र्याच्या ऐंशीव्या वर्षात प्रवेश करीत असताना मागील प्रवासाचा अभिमान बाळगतानाच पुढील वाटचालीचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, उद्योग, शिक्षण आणि लोकशाहीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक विषमता, बेरोजगारी, गरिबी, पर्यावरणीय संकट, शिक्षण आणि आरोग्यातील असमानता यांसारखी आव्हाने अद्याप आहेत. त्यामुळे आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक न्याय, तंत्रज्ञानासोबत मानवी संवेदना आणि अधिकारांसोबत कर्तव्य यांचा समतोल साधणे आवश्यक आहे.

या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण ज्ञात–अज्ञात सर्व स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन करूया. त्यांच्या त्यागाचे स्मरण करून संविधानिक मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प करूया. न्यायासाठी उभे राहूया, स्वातंत्र्याचा जबाबदारीने वापर करूया, समानतेचा स्वीकार करूया आणि बंधुतेची भावना वाढवूया. जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीला सन्मान देऊया. लोकशाहीतील मतभेदांचा आदर करूया आणि संवादाची संस्कृती मजबूत करूया.

स्वातंत्र्य ही आपल्या पूर्वजांनी दिलेली अमूल्य देणगी आहे; परंतु ती पुढील पिढ्यांसाठी अधिक समृद्ध करून ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. स्वातंत्र्यवीरांनी परकीय सत्तेच्या बेड्या तोडल्या; आज आपल्याला अज्ञान, विषमता, सामाजिक द्वेष, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारख्या नव्या आव्हानांवर मात करायची आहे. ही लढाई शस्त्रांची नसून ज्ञानाची, विवेकाची, प्रामाणिकपणाची आणि सामाजिक बांधिलकीची आहे.

तिरंगा जेव्हा आकाशात डौलाने फडकतो, तेव्हा त्याच्याकडे पाहताना आपल्या मनात केवळ राष्ट्राभिमान नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्याची जाणीवही निर्माण झाली पाहिजे. त्या तिरंग्यात स्वातंत्र्यवीरांचा त्याग, संविधाननिर्मात्यांची दूरदृष्टी आणि कोट्यवधी भारतीयांच्या भविष्याची स्वप्ने सामावलेली आहेत. त्या स्वप्नांना साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडणे आवश्यक आहे.

म्हणूनच या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण असा भारत घडविण्याचा संकल्प करूया, जिथे प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळेल, प्रत्येक युवकाला सन्मानजनक रोजगाराची संधी मिळेल, प्रत्येक महिलेला समानता आणि सुरक्षितता मिळेल, प्रत्येक शेतकऱ्याला सन्मानाने जगता येईल, प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला समान संधी मिळेल आणि कोणत्याही व्यक्तीला जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीमुळे अन्याय सहन करावा लागणार नाही. असा भारत निर्माण करणे हीच संविधानिक मूल्यांची खरी अंमलबजावणी ठरेल.

भारतीय स्वातंत्र्य ही केवळ भूतकाळातील ऐतिहासिक घटना नाही; ती वर्तमानातील जबाबदारी आणि भविष्याची आशा आहे. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून भारतीय लोकशाहीचे नैतिक अधिष्ठान आहे. स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्यांचा संगमच भारताच्या राष्ट्रजीवनाला अर्थ देतो. म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करताना संविधानाचा सन्मान, लोकशाहीवरील विश्वास, सामाजिक समतेची बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना आपल्या मनात दृढ करूया. स्वातंत्र्य मिळविणे हा आपल्या पूर्वजांचा महान पराक्रम होता; परंतु त्या स्वातंत्र्याला न्याय, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेने समृद्ध करणे ही आपल्या पिढीची ऐतिहासिक जबाबदारी आहे. आपल्या प्रत्येक जबाबदार कृतीतून संविधानिक मूल्यांना बळ मिळाले, तर स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाला खरी आदरांजली मिळेल. तिरंगा सदैव उंच फडकत राहो, भारतीय लोकशाही अधिक बळकट होत राहो, संविधानिक मूल्यांचा प्रकाश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचो आणि भारत अधिक समतामूलक, न्याय्य, सक्षम व मानवी राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहो, हीच स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र प्रसंगी मनःपूर्वक शुभेच्छा.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

## स्वातंत्र्याचा सोहळा

रामायनाची एकात्मता,
महाभारताची भगवतगीता
स्वातंत्र्यची यशोगाथा... !

शिवशंभूचा इतिहास ३५०
वर्षानंतर ही तेजरत्नात राहतो...

स्वराज हे राजांचा इतिहास,
भारत बलिदानच धाडस,
यशवंती घोरपडीच साहस,

कितीतरी वर्षे, त्यागाची, यशाची
विश्वासाची, एकनिष्ठची,
त्यागस्फूर्ती काय असते,

कित्येक बलिदान गेले,
हाडामासाचे चिखल उडाले,
रक्ताचे पाठ वाहिले...

कितीतरी वर्षे पराक्रमाची,
क्रांतीची, अस्मितेची, तेजाची...

आम्ही श्वासात तिरंगा वाहतो,
आम्ही शब्दात तिरंगा बोलतो,
आम्ही धर्म ही तिरंगा सांगतो,

हे स्वतंत्र्य मंगल्याचे,
हे स्वतंत्र्य पवित्र्याचे,
हे स्वतंत्र्य वात्सल्याचे,

आईविना भिकारी,
तिन्ही जगाचा स्वामी,
कर्म धर्म जपणारी भूमी,

कर्तव्यचा विजयस्तंभ भारताच
कर्तृत्व सांगतो...
सूर्याच्या तेजात,
चंद्राच्या प्रकाशात,
भारताच्या स्वतंत्र्यात,
तिरंगा अमुचा सुपात्र नांदतो... !

**मयुरी विश्वनाथ बाबर**
पंढरपूर
9112443343




## वात्रटिका

### स्वातंत्र्य दिन (दीन)

स्वातंत्र्यानंतरही लढतोय
आणि उगाच रडतोय आम्ही...
येवढे बेताल झालोत आणि
येवढे बिघडलोय आम्ही...
जाती धर्माच्या पलीकडे
माणुसकी जपली पाहिजे...
लोकशाहीत जगताना ती
नैतिकता आपली पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत महापालिकेच्या वतीने सायकल रॅली




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. देशभक्तीचा संदेश, पर्यावरण संवर्धन तसेच सायकल वापरातून निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या रॅलीला सोलापूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सोलापूर महानगरपालिका आवारातून सकाळी ठीक ६.०० वाजता रॅलीला सुरुवात झाली. मा. उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर, स्थायी समिती सभापती रंजीत चाकोते व कामगार व समाजकल्याण सभापती श्रद्धा पवार, गटनेत्या वहिदा शेख यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीचा शुभारंभ करण्यात आला.

रॅलीच्या प्रारंभी उपस्थितांच्या वतीने ‘वंदे मातरम्’ या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सामूहिक गायन करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला होता.

सायकल रॅलीचा मार्ग सोलापूर महानगरपालिका आवार –पार्क चौक – भैय्या चौक– छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, शिवाजी चौक –नवी पेठ – लकी चौक – किल्ला बगीचा परिसर – पार्क चौक –डफरीन चौक– सोलापूर महानगरपालिका आवार असा होता. विविध भागांतून मार्गक्रमण करत रॅलीची सांगता पुन्हा महानगरपालिका आवारात झाली.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांनी उपस्थित सायकलप्रेमी, नागरिक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

तसेच देशभक्तीसोबतच पर्यावरण संरक्षण, प्रदूषणमुक्त शहर आणि निरोगी सोलापूर यासाठी सायकलचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले.

स्थायी समिती सभापती रंजीत चाकोते यांनी रॅलीत सहभागी झालेल्या सर्व सायकलप्रेमी, नागरिक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत, अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये देशप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होत असल्याचे नमूद केले. सायकल रॅलीच्या माध्यमातून ‘हर घर तिरंगा’अभियानाचा संदेश घराघरात पोहोचविण्यासोबतच पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी स्थापत्य समिती सभापती विजय चिप्पा, नगरसेविका वाहिदा शेख, नगरसेवक प्रशांत पल्ली, उपायुक्त सोनाली यादव, मुख्य लेखापाल रत्नराज जवळगेकर, प्रशासन अधिकारी माने, सहाय्यक आयुक्त युवराज गाडेकर, समाज विकास अधिकारी अजित खानसोळे, लाईट विभाग अधीक्षक इंगळे, उद्यान विभाग अधीक्षक कोमल काशीद, पर्यावरण संवर्धन अधिकारी अक्षय मोरे, पशुसंवर्धन अधिकारी सतीश चौगुले, पर्यावरण अधिकारी स्वप्निल सोलंकर यांच्यासह सोलापूर महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व सायकलप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर सायकल रॅलीच्या आयोजनासाठी रॉयल रायडर्स सायकलिंग असोसिएशन, सोलापूरचे प्रमुख अभिनय बावठणकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

रॅलीनंतर सहभागी सभासद व सायकलप्रेमींसाठी महानगरपालिका आवारात चहा, बिस्कीट व केळीची व्यवस्था करण्यात आली होती.

‘हर घर तिरंगा’, देशभक्ती, निरोगी जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धन असा त्रिसूत्री संदेश देणारी ही सायकल रॅली उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली.

# आ. अभिजीत पाटील यांनी घेतली कार्यकारी अभियंता यांची भेट



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):–** सिना–माढा उपसा सिंचन योजना सुरू होऊन जवळपास २१ वर्षांचा कालावधी झाला आहे. या प्रदीर्घ कालावधीनंतर योजनेतील मोटारी, पंप तसेच पाईपलाईनमध्ये मोठ्या प्रमाणात बिघाड आणि गळतीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. परिणामी योजनेची निर्धारित क्षमता ५०० क्युसेक्स असताना प्रत्यक्षात अनेक वेळा केवळ २०० ते २५० क्युसेक्स पाणीच शेतकऱ्यांना मिळते. त्यामुळे शेतीला टेल–टू–टेल पाणी देण्यात मोठी अडचण निर्माण होत असल्याचे सांगितले.

यासाठी जुन्या व नादुरुस्त मोटारी बदलणे, नवीन मोटारी बसवणे तसेच जीर्ण झालेल्या पाईपलाईन नव्याने टाकणे आवश्यक आहे. याबाबतचा विशेष दुरुस्तीचा प्रस्ताव महामंडळाकडे आलेला असून, त्यातील त्रुटी दूर करून हा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा, अशी मागणी आज कार्यकारी अभियंता धुमाळ साहेब यांच्याकडे केली.

**पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी साठविण्यासाठी समांतर योजना :**

सध्या पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर नदीचे पाणी वाहून जाते. एकीकडे पूरपरिस्थितीत मोठ्या प्रमाणात पाणी पुढे वाहून जाते, तर दुसरीकडे उन्हाळ्यात शेतकऱ्यांना पाण्याची तीव्र टंचाई भासते. ही परिस्थिती बदलण्यासाठी सिना–माढा उपसा सिंचन योजनेला समांतर जलसाठवण योजना उभारण्याची गरज आहे असल्याचे सांगितले.

या भागातील १७९ तलावांचे खोलीकरण व आवश्यक सुधारणा करून त्यांना प्रभावी पाणीसाठवण तलावांमध्ये रूपांतरित करावे, अशी मागणी करण्यात आली. सध्या असलेल्या १५०० एचपी क्षमतेच्या मोटारींची क्षमता वाढवून ती सुमारे ३००० एचपी करावी आणि पावसाळ्यात नदीला मोठ्या प्रमाणात पाणी असताना या वाढीव क्षमतेद्वारे पाणी उचलून सर्व १७९ तलाव पूर्ण क्षमतेने भरावेत.

यामुळे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी स्थानिक पातळीवर साठवता येईल आणि उन्हाळ्यात शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होईल. तसेच पाणीटंचाई कमी होऊन शेतीला अधिक शाश्वत जलस्रोत उपलब्ध होईल.

**सिना–माढा उपसा सिंचन योजनेचे वीजबिल सरकारने भरावे :**

सिना–माढा उपसा सिंचन योजनेच्या वीजबिलाचा मोठा आर्थिक भार शेतकऱ्यांवर पडत आहे. सध्याची दुष्काळसदृश परिस्थिती आणि शेतकऱ्यांची आर्थिक अडचण लक्षात घेता, या योजनेचे वीजबिल शासनाने भरावे, यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. याबाबत सकारात्मक प्रतिसाद देत पुढील कार्यवाही करण्याबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

**भूसंपादनाच्या प्रश्नावरही चर्चा:**

व्होळे तसेच परिसरातील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाशी संबंधित प्रलंबित अडचणींबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि भूसंपादनाच्या प्रश्नावर योग्य तो मार्ग काढण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी आमदार अभिजीत पाटील यांनी केली.

# राजाभाऊ कदम यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला यश; १५ ऑगस्टचे आंदोलन स्थगित



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** उमरड येथील धोकादायक ठिकाणी गतिरोधक उभारावेत, या मागणीसाठी गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने आंदोलनकर्त्यांनी सुचविलेल्या ठिकाणी गतिरोधकांची उभारणी केली आहे. त्यामुळे १५ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेले रस्ता रोको आंदोलन स्थगित करण्यात आल्याची घोषणा बहुजन संघर्ष सेनेचे जिल्हाध्यक्ष तथा आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजाभाऊ कदम यांनी केली आहे.

कुंभेज फाटा ते रामवाडी या मार्गावरील उमरड परिसरातील धोकादायक ठिकाणी गतिरोधक उभारण्याची मागणी ग्रामस्थांकडून सातत्याने करण्यात येत होती. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या करमाळा उपविभागाकडे गेल्या दोन महिन्यांपासून पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र, मागणीची पूर्तता होत नसल्याने १५ ऑगस्ट रोजी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता.

या आंदोलनाची घोषणा झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ दखल घेतल्याचे दिसून आले. शुक्रवार, १४ ऑगस्ट रोजी उमरड येथील आंदोलनकर्त्यांनी मागणी केलेल्या सर्व ठिकाणी गतिरोधकांची उभारणी करण्यात आली.

उमरड येथील कोठावळे शॉपिंग सेंटरजवळील धोकादायक वळण तसेच चौधरी वलटे वस्ती परिसरातील रस्ता या दोन्ही ठिकाणी यापूर्वी अनेक अपघात घडल्याचे ग्रामस्थांनी सांगितले होते. या पार्श्वभूमीवर वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी गतिरोधक उभारण्याची मागणी करण्यात आली होती.

गतिरोधकांची उभारणी झाल्यानंतर ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, भविष्यात या ठिकाणी अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, प्रस्तावित आंदोलनाला गावकऱ्यांचा मोठा पाठिंबा मिळाला होता. मात्र, मागणी मान्य झाल्याने १५ ऑगस्ट रोजीचे रस्ता रोको आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती राजाभाऊ कदम यांनी दिली.

# हुतात्मा महादेव शिंदे यांचे स्मारक तरुणांचे प्रेरणास्थळ होईल –पालकमंत्री गोरे



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** बलवडी गावासाठी आजचा दिवस अभिमानाचा व शौयार्चा आहे. कारण 59 वर्षांनंतरही देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीर सुपुत्राला गावाने विसरले नाही. सांगोला तालुक्यातील बलवडी गावात आज हुतात्मा महादेव शिंदे यांच्या स्मारकाचे अनावरण माज्या हस्ते झाले हे माझे भाग्य आहे. हुतात्मा महादेव शिंदे यांचे स्मारक सांगोला तालुक्यातील तरुणांचे प्रेरणास्थळ होईल असा विश्वास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.

बलवडी (ता सांगोला) येथील हुतात्मा महादेव शिंदे स्मारकाचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते हुतात्मा स्मारकाचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील, तहसीलदार बाळू ताई भागवत, गटविकास अधिकारी योगेश कांबळे, पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री गोरे यांनी बलवडी गावात हुतात्मा भवन उभारण्यासाठी 50 लाख रुपयांचा निधी देण्यात येईल अशी घोषणा केली. "आजचा दिवस बलवडीसाठी शौर्याचा आहे. हुतात्मा महादेव शिंदे आणि वीर माता पद्मिनी आई यांच्या त्यागामुळे देश सुरक्षित आहे. माज्या हस्ते स्मारकाचे अनावरण होणे हे माझे भाग्य आहे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, "सैनिकाची देशसेवा संपली तरी देशप्रेम संपत नाही. वीर माता पद्मिनी आई यांनी कुटुंब उभारून दिलेल्या बळामुळेच आज आपण त्यांना वंदन करू शकतो. देशासाठी शिंदे कुटुंबाचा त्याग मोठा आहे." त्यांनी यावेळी सांगोला तालुक्यातील माण नदीतील पाण्याचा प्रश्न सोडवल्यानंतर आता विजेचा आणि पोलीस स्टेशनचा प्रश्न देखील मार्गी लावण्याची ग्वाही दिली.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी "पालकमंत्र्यांनी सांगोला तालुक्यात मानाचा तुरा रोवला आहे" असे मत व्यक्त केले.

यावेळी माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांचेही मनोगत झाले. कार्यक्रमात वीरमाता पद्मिनी आई शिंदे आणि सुभेदार राजेंद्र धायगुडे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य संभाजी शिंदे यांच्या प्रास्ताविकाने झाली. सूत्रसंचालन तात्यासो शिंदे यांनी केले तर आभार माजी सरपंच बाळासाहेब शिंदे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# लखनौच्या भूमीत महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचा भव्य आविष्कार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यावतीने उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथे आयोजित विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविण्यात येणार आहे. महाराष्ट्राची भक्तीपरंपरा, लोककला, लोकसंस्कृती, सण–उत्सव आणि ऐतिहासिक वैभव यांचा कलात्मक आविष्कार ‘नमन व दिंडी नृत्य’ या विशेष सादरीकरणातून करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा देशाच्या विविध भागांत परिचय करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील कलाकारांचे विशेष पथक लखनौ येथे दाखल झाले आहे.

हे सांस्कृतिक सादरीकरण सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात येणार आहे.

## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**
**ब.अ.नं.१०४२/२०२६ कि.अ.क्र.१०४३/२०२६**

संस्थेचे नांवः– श्री शिंदे सरकार वाडा व होळकर वाडा भाडेकरू व्यापारी कल्याणकारी संघ पंढरपूर नगर भूमापन क २५८३ पंढरपूर ता पंढरपूर जि सोलापूर
न्यास नों.क्र. :– एफ –३३६२८/सोलापूर
अर्जदार –श्री विठ्ठल तुळजणसा खटवटे
विरूध्द :– कोणी नाही–गैरअर्जदार

सदरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ व सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० चे कलम १२–अ अन्वये संस्थेच्या उद्देश वाढ करून मिळणेसाठी अर्ज मा. धर्मादाय उपाआयुक्त साहेब यांच्या कार्यालयात दाखल केलेले आहे. या नोटीसीध्दारे कळविण्यात येते की. या न्यासाचे आपले काही संबध असल्यास अथवा काही हरकत/तक्रार नोंद करायची असल्यास आपण स्वत: किंवा वकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही. आणि एकतर्फा हुकुम करून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. धर्मादाय उपाआयुक्त साहेब यांचे शिक्यानिशी दि १३/०८/२०२६ दिली आहे.

शिक्का

**अधिक्षक**
**सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय**
**सोलापूर विभाग सोलापूर**

# नगरसेविका सरताज सय्यद यांच्या मागणीला यश

## कॅनॉल वरील पुलाची केली दुरुस्ती



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):–** मोहोळ शहरातील पश्चिमेकडील भागातील विश्वनाथ नगर, क्रांतीनगर समर्थ नगर, दत्त नगर, गुलशन नगर या भागांना जोडणारा सर्वात महत्त्वाचा असलेला विश्वनाथ नगर मधील कॅनल वरील लोखंडी पूल मोहोळ येथील भीमा विकास उर्पावभागाच्या अंतर्गत येत असलेला विश्वनाथ नगर येथील लोखंडी पूल सध्या अत्यंत जीर्ण आणि दळणवळणासाठी धोकादायक बनला आहे. या पलावरून दररोज मोठ्या संख्येने शाळकरी मुले, नागरिक, शेतकरी ये–जा असते.

या पुलाची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली. हा पूल नगरपरिषद प्रभाग क्रमांक नऊ या भागातील दळणवळणाचा मुख्य दुवा असल्याने, कोणतीही मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी त्यावर तात्काळ उपाययोजना करण्याबाबतचे पत्र नगरसेविका सरताज सरफराज सय्यद यांनी उपविभागीय अधिकारी भीमा विकास विभाग यांच्याकडे केली होती या मागणीची दखल घेत पुलाची दुरुस्ती केली.



प्रभाग क्रमांक नऊच्या मतदार बंधू भगिनींनी मोठ्या विश्वासाने माझी पत्नी सरताज सय्यद यांना मोठ्या मताधिक्याने देत. सुजाण नागरिकांनी नगरसेवक होण्याची अत्यंत महत्त्वाची अशी सवर्णसंधी दिली.प्रभागाचे विकासासाठी निवडणुकीमध्ये प्रभागातील मतदार बंधू भगिनींना विकास कामाचे दिलेले आश्वासन त्या निवडणूक मध्ये निवडून आल्यानंतर नगरसेवक हे जनतेचा सेवक म्हणून काम करण्याचा निर्धार केला आहे.

आमदार राजाभाऊ खरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील जनतेच्या समस्या जाणून समस्या कायमस्वरूपी हटवायची हे ध्येय ठेवून काम करण्याचा माझा मानस आहे.

**– सरफराज सय्यद,** रुग्ण कल्याण समिती सदस्य ग्रामीण रुग्णालय


# Classified - छोटी जाहीरात

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

## वर–वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु–वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा २५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु – 30

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | | 8 | | 1 | 7 | 5 | |
| | 7 | | 5 | 4 | 9 | | 1 | |
| | | 3 | 6 | | 2 | | 8 | |
| 2 | | | 3 | | 6 | | 4 | |
| | 6 | | 1 | 5 | | | | |
| | 3 | 5 | | 8 | 4 | 6 | | |
| | | 6 | 4 | 1 | | | | |
| | 5 | 8 | | | | 9 | 2 | |
| | | 7 | 9 | | | 1 | 6 | 5 |

# सोलापूर जिल्ह्यात 683 कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रे नामंजूर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रांसाठी दाखल झालेल्या अर्जांपैकी तब्बल ६८३ अर्ज नामंजूर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. २४ ऑक्टोबर ते ५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत जिल्ह्यात वितरित, नामंजूर आणि प्रलंबित जात प्रमाणपत्रांची आकडेवारी समोर आली असून, या प्रक्रियेत पुराव्यांच्या त्रुटींमुळे अनेक अर्जदारांना प्रमाणपत्र मिळू शकलेले नाही.

या कालावधीत जिल्ह्यात एकूण ६२ हजार ९२५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ६२ हजार २३६ अर्जदारांना जात प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. तर ६ अर्ज अद्याप प्रलंबित आहेत. उर्वरित ६८३ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत.

नामंजुरीच्या कारणांमध्ये अर्जदारांनी सादर केलेल्या पुराव्यांमध्ये खाडाखोड आढळणे, वंशावळीत नाते स्पष्ट करणारे आवश्यक पुरावे सादर न करणे, कुणबी जातीचा महसुली पुरावा उपलब्ध नसणे, तसेच कागदपत्रांमध्ये स्पेलिंगच्या चुका असणे आदी बाबींचा समावेश आहे. दरम्यान, अर्ज प्राप्त होण्याच्या संख्येतही उपविभागनिहाय मोठी तफावत दिसून येते. उपविभागीय अधिकारी, सोलापूर विभाग क्रमांक १ येथे सर्वाधिक २९ हजार २७७ अर्ज प्राप्त झाले आहेत. तर सोलापूर विभाग क्रमांक २ येथे सर्वात कमी म्हणजे ११८ अर्ज दाखल झाले होते. त्यामुळे विविध उपविभागांमध्ये अर्जांची संख्या आणि प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया हा देखील चचेर्चा विषय ठरला आहे.

**हैदराबाद गॅझेटचे काय झाले ?**

सोलापूर जिल्ह्यात हैदराबाद गॅझेटच्या आधारे वितरित करण्यात आलेल्या जात प्रमाणपत्रांची संख्या शून्य असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, हैदराबाद गॅझेटच्या आधारे जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी एकही अर्ज दाखल झालेला नाही.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आंदोलन करणारे मनोज जरांगे-पाटील यांनी गेल्या आठवड्यात सोलापूर जिल्ह्यातील निजामशाहीतील गावांचा दौरा करून, हैदराबाद गॅझेटच्या आधारे पात्रांना तातडीने जात प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीचा मुद्दा आगामी काळात पुन्हा ऐरणीवर येण्याची शक्यता आहे.

६२ हजारांहून अधिक प्रमाणपत्रांचे वितरण झाले असले, तरी ६८३ अर्ज नामंजूर होण्यामागील कारणे आणि हैदराबाद गॅझेटच्या आधारे एकही अर्ज दाखल न होणे, या दोन्ही बाबींकडे आता प्रशासन आणि मराठा समाजाचे लक्ष लागले आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या कर्ज योजनांतील अडचणी दूर करा



**करमाळा (कटूसत्य वृत्त):** सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज योजनांचा लाभ घेताना मराठा समाजातील तरुणांना येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या मागणीचे निवेदन महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांना देण्यात आले.

यावेळी आमदार राजेंद्र राऊत, सकल मराठा समाजाचे तालुकाध्यक्ष सचिन काळे, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष चव्हाण, सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवक आनंद जाधव, करमाळा स्वराज्य पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रवीण हिरगुडे, शंभू जगताप यांच्यासह मराठा समाजातील बांधव उपस्थित होते.

निवेदनात वाहन कर्जासाठी बंद असलेली एलओआय प्रक्रिया पुन्हा सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली. अनेक मराठा बांधवांकडे शेती किंवा स्वतःची जागा नसल्याने बँकेला तारण देण्यासाठी त्यांच्याकडे मालमत्ता उपलब्ध नसते. चार लाख रुपयांपेक्षा अधिक कजार्साठी दोन जामीनदारांची अट असल्याने सुशिक्षित बेरोजगार तरुणांना कर्ज मिळण्यात अडचणी येतात. त्यामुळे ही अट रद्द करून विनातारण कर्ज उपलब्ध करून देण्याचे आदेश बँकांना द्यावेत, अशी मागणी करण्यात आली.

**महामंडळाच्या योजनांची स्पष्ट माहिती द्यावी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या महाराष्ट्रातील विविध योजनांची संख्या, त्यावरील सबसिडी आणि व्याजदर यांची स्पष्ट माहिती लाभार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती देण्यास टाळाटाळ होत असून दलालांमार्फत प्रकरणे जलद केली जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला.

कर्ज मंजूर झाल्यानंतर महामंडळाकडून बँकेला सबसिडीची रक्कम मिळण्यासाठी सहा ते आठ महिन्यांचा कालावधी लागत असल्याने या काळात व्यावसायिकांना स्वतःच्या खिशातून हप्ते भरावे लागतात. त्यामुळे व्यवसायावर आर्थिक ताण येत असून व्याज परतावा वेळेत मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

**व्याज परतावा आणि प्रलंबित सबसिडी तातडीने द्यावी**

लाभार्थ्यांना दरमहा व्याज परतावा सुरळीत मिळावा तसेच प्रलंबित सबसिडी आणि व्याजाचे हप्ते शासनाने तत्काळ भरण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच सिबिल स्कोअर ६५० पेक्षा कमी असल्यास बँका कर्ज प्रकरणे नाकारत असल्याने लहान कर्जदारांकडे सिबिल स्कोअर नसण्याच्या समस्येकडेही गांभीर्याने पाहावे, अशी मागणी करण्यात आली.

**करमाळ्यातील कामे ऑनलाइन करण्याची मागणी**

अण्णासाहेब पाटील महामंडळाचे जिल्हा कार्यालय सोलापूर येथे असल्याने करमाळा तालुक्यातील लाभार्थ्यांना वारंवार सोलापूरला जावे लागते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल लाभार्थ्यांना हा प्रवास परवडत नसल्याने करमाळा तालुक्यातील शंभर टक्के कामे ऑनलाइन, ई-मेल किंवा फोनद्वारे करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सचिन काळे यांनी केली.

'जिल्हा कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून लाभार्थ्यांना आवश्यक माहिती व्यवस्थित मिळत नाही. करमाळा हा जिल्ह्याच्या शेवटच्या टोकाला असल्याने ये-जा करणे गोरगरीब मराठा बांधवांना परवडत नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना लाभार्थ्यांना सहकार्य करण्याचे आदेश द्यावेत,' असे सचिन काळे यांनी सांगितले.

**बिनव्याजी कर्जाच्या प्रकरणांना पुन्हा संधी द्यावी**

महामंडळाच्या संकेतस्थळावर बिनव्याजी कर्ज प्रकरणे अपलोड करण्याचा पर्याय उपलब्ध नसल्याने अनेक प्रकरणे दाखल करता येत नाहीत. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना पुन्हा अर्ज अपलोड करण्याची संधी तातडीने द्यावी, अशी मागणी प्रवीण हिरगुडे यांनी केली.

'लाभार्थी कर्जाचे हप्ते वेळेवर भरत असतानाही गेल्या काही महिन्यांपासून व्याज परतावा वेळेत मिळत नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवत आहे. तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांमधील त्रुटी दूर करण्यास विलंब होत आहे. कागदपत्रांची तपासणी व त्रुटींचे निरसन कमी वेळेत करण्याचे आदेश द्यावेत,' अशी मागणी हिरगुडे यांनी केली.

मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगार आणि नवउद्योजकांना महामंडळाच्या योजनांचा सुलभपणे लाभ मिळावा, यासाठी कर्ज प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि जलद करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

# अक्कलकोट तालुक्यातील सिंचनाच्या प्रलंबित कामांना गती द्या



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील सिंचनाच्या प्रलंबित कामांना गती देऊन शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केली. त्यांच्या पुढाकाराने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत मतदारसंघातील सिंचनाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उजनी डावा कालवा व त्याअंतर्गत येणाऱ्या शाखा कालव्यांच्या विशेष दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्याबरोबरच अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील विविध मध्यम व लघु प्रकल्प तसेच कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या विशेष दुरुस्तीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार कल्याणशेट्टी यांनी केली. तसेच संबंधित कामांसाठी विशेष सर्वेक्षण करण्याची मागणीही त्यांनी बैठकीत केली.

अनेक ठिकाणी कालवे आणि सिंचन यंत्रणेची दुरवस्था झाल्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित पाण्याचा लाभ मिळत नाही. त्यामुळे कालव्यांची दुरुस्ती, शाखा कालव्यांची कार्यक्षमता वाढविणे, बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि पाणीसाठा वाढविणाऱ्या प्रकल्पांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

**मंजूर कामे तातडीने सुरू करण्याची मागणी**

अक्कलकोटसह दक्षिण सोलापूर भागातील शेतकऱ्यांसाठी सिंचनाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. ज्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली असून त्यासाठी निधीही उपलब्ध आहे, अशी कामे कोणत्याही विलंबाशिवाय प्रत्यक्ष सुरू करावीत, अशी आग्रही मागणी आमदार कल्याणशेट्टी यांनी केली.

मंजूर कामे केवळ कागदावर न राहता त्यांची जलद गतीने अंमलबजावणी व्हावी, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीच्या सूचना द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली.

**कामे तात्काळ सुरू करा : विखे पाटील**

बैठकीदरम्यान जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेतली. प्रशासकीय मंजुरी आणि निधी उपलब्ध असलेल्या कामांना लवकरात लवकर सुरुवात करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

तसेच प्रलंबित सिंचन विषयांवर आवश्यक कार्यवाही करून शेतकऱ्यांना पाण्याचा लाभ मिळवून देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेण्यात आली. या बैठकीमुळे अक्कलकोट तालुक्यातील सिंचनाच्या प्रलंबित कामांना गती मिळण्याची अपेक्षा असून शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# विद्या विकास प्रतिष्ठानमध्ये ग्रंथप्रदर्शन

## डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त विद्या विकास प्रतिष्ठान पॉलिटेक्निकमध्ये ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हीव्हीपीआयटीचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. अरुण गायकवाड होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. सुनीलदत्त कुलकर्णी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. सुनीलदत्त कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमी करून पुस्तक वाचनाकडे वळण्याचे आवाहन केले.

सॉफ्ट कॉपी वाचण्यापेक्षा ग्रंथालयातून पुस्तके घेऊन त्यांचे नियमित वाचन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. रंगनाथन यांनी मांडलेल्या ग्रंथालयाच्या पाच सिद्धांतांची माहितीही त्यांनी विद्यार्थ्यांना दिली.

कॅम्पस डायरेक्टर डॉ. अरुण गायकवाड यांनी ग्रंथप्रदर्शनासारखे उपक्रम सातत्याने आयोजित होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल चंद्रकांत नवत्रे यांनी केले. यावेळी विभागप्रमुख साईकृष्ण चव्हाण, अनिरुद्ध पेठकर, प्रसाद वळसंगे, मकरंद बुद्धे, किरण वाघ, रेखा बिराजदार आदी उपस्थित होते.

ग्रंथपाल दिनानिमित्त संस्थाध्यक्ष अमोल चव्हाण आणि संस्थापक चेअरमन डॉ. जी. के. देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार प्रा. अनिल अवधूत यांनी मानले.

# मोहोळ शहरात भाजपच्या वतीने भव्य तिरंगा रॅली

## ना. राजन पाटील, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांचा सहभाग



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा; अभियानांतर्गत मोहोळ शहरात भारतीय जनता पक्षाच्या वतीने भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. देशभक्तीची भावना वृद्धिंगत करून राष्ट्रीय अभिमान जागृत करण्याचा संदेश या रॅलीतून देण्यात आला. राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत ही रॅली उत्साहात पार पडली.

रॅलीच्या प्रारंभी भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अधार्कृती पुतळयास पुष्पहार अर्पण करून तिरंगा रॅलीला सुरुवात झाली. बुधवार पेठ, आदर्श चौक, गवत्या मारुती चौक आणि मेन रोडमार्गे रॅली पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे मार्गस्थ झाली.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ना. राजन पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शक संकल्पनेतून देशभरात 'हर घर तिरंगा' अभियान राबविले जात आहे. या अभियानातून नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना अधिक दृढ होत असून राष्ट्रीय अभिमान जागृत करण्याचे कार्य सुरू आहे. मोहोळ शहर व तालुक्यात भाजपच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही तिरंगा रॅली देशभक्तीचे स्फुरण निर्माण करणारी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. रॅलीमध्ये भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

याप्रसंगी मोहोळचे उपनगराध्यक्ष दत्तात्रय खवळे, उपाध्यक्ष सुरेश राऊत, प्रकाश चवरे, तालुकाध्यक्ष सतीश काळे, नगरसेवक मुश्ताक शेख, प्रमोद डोके, सुशिल क्षीरसागर, रुपेश धोत्रे, एजाज तलफदार, गुरुराज तागडे, अनिस कुरेशी, चंदन बरे, अंकुश अवताडे, सचिन चव्हाण, सुदर्शन कादे, राजू सुतार, संतोष धोत्रे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

रॅलीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे रॅली उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

# 'वंदे मातरम्' च्या जयघोषाने दुमदुमले बार्शी शहर



**बार्शी (कटूसत्य वृत्त) :-** भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्ती, राष्ट्राभिमान आणि तिरंग्याप्रती सन्मानाची भावना जागविण्यासाठी भारतीय जनता पार्टी व भारतीय जनता युवा मोर्चा, बार्शी शहर व तालुका यांच्या वतीने गुरुवार, १३ ऑगस्ट रोजी बार्शी शहरात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. आमदार राजाभाऊ राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगरसेवक विजय राऊत आणि भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली उत्साहात पार पडली.

'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्' च्या जयघोषाने संपूर्ण बार्शी शहर दुमदुमून गेले. तिरंगा हातात घेऊन मोठ्या संख्येने नागरिक, भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते रॅलीत सहभागी झाले होते.

सीमेवर भारतमातेच्या रक्षणासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या शूर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, त्यांच्या शौर्याला सलाम करणे, तसेच देशाची एकजूट, सामर्थ्य आणि राष्ट्रभक्तीची भावना नागरिकांमध्ये जागृत करणे हा या तिरंगा रॅलीचा प्रमुख उद्देश होता.

रॅलीची सुरुवात कृषी उत्पन्न बाजार समिती, तुळजापूर रोड येथून झाली. त्यानंतर बाजार समिती, पोस्ट चौक, जुने पोलीस स्टेशन, पांडे चौक, शिवसृष्टी, तानाजी चौक, बेदराई चौक, हांडे गल्ली आणि पंचायत समिती मार्गे रॅली शहीद स्मारक येथे पोहोचली. शहीद स्मारक येथे अभिवादन करून रॅलीची सांगता करण्यात आली.

यावेळी बाजार समितीचे चेअरमन विजय गरड, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, भाजपा शहराध्यक्ष महावीर कदम, तालुकाध्यक्ष बबन गडदे, युवा मोर्चा शहराध्यक्ष अमोल डिसले, पप्पू हनुमंते, रोहित लाकाळ यांच्यासह भाजपा व भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक कार्याबद्दल ॲड. राजन दीक्षित यांचा सपत्नीक सत्कार



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी साप्ताहिक अनंत विचार परिवाराच्या वतीने गुरुवारी (दि. १३ ऑगस्ट) पंढरपूर येथे विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ह.भ.प. जळगावकर महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात सामाजिक कार्याबद्दल ॲड. राजन दीक्षित यांचा ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब बडवे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

समाजातील विविध जाती-धर्मातील तसेच साहित्य, लेखन, क्रीडा, चित्रपट, सामाजिक सेवा, शिक्षण, पत्रकारिता आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रांत निःस्वार्थपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता.

सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून समाजहितासाठी योगदान देणारे ॲड. राजन दीक्षित यांच्या कार्याची दखल घेत त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब बडवे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन हा गौरव करण्यात आला.

यावेळी ह.भ.प. जळगावकर महाराज यांनी विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम असल्याचे सांगितले. समाजाच्या जडणघडणीत सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, लेखक, कलाकार, खेळाडू आणि शिक्षक यांचे योगदान महत्त्वाचे असून, त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना ॲड. राजन दीक्षित यांनी अनंत विचार परिवाराचे आभार मानले. सामाजिक कार्याची दखल घेऊन केलेला हा सन्मान भविष्यात अधिक जोमाने समाजकार्य करण्याची प्रेरणा देणारा असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, साहित्यिक, शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती तसेच साप्ताहिक अनंत विचार परिवाराचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# भंडारकवठे येथे सोमवारी श्री अमरसिद्ध मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना




**भंडारकवठे (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथे सोमवार दि.१७ ऑगस्ट रोजी श्री महासिद्ध मंदिरात श्री अमरसिद्ध देवाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. यानिमित्ताने दि.१६ व १७ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि.१६ रोजी सकाळी सात वाजता कोल्हापूर येथे बनविण्यात आलेल्या मूर्तीला सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील उमदी येथील सिद्धपुरुष श्री वीर मलकारसिद्ध मंदिरात धार्मिक विधी होणार आहे.तदनंतर मूर्तीचे भंडारकवठेकडे प्रस्थान होणार आहे.

रविवार दि.१६ रोजी सायंकाळी पाच वाजता श्री अमरसिद्ध देवाच्या नवीन मूर्तीची सवाद्य मिरवणूक श्री हनुमान मंदिरापासून श्री महासिद्ध व श्री अमरसिद्ध मंदिराकडे निघणार आहे तदनंतर महाअभिषेक, पूजा अर्चा, मंत्रोच्चार, संकल्प, देवतेचे आवाहन कार्यक्रम आदी विविध कार्यक्रम होणार आहे तसेच रात्रभर भजन व कन्नड ढोलकी गायनाचा कार्यक्रम, जागरण आणि नामस्मरणाचा कार्यक्रम होणार आहे. सोमवार दि.१७ रोजी पहाटे पाच वाजता पहिल्या श्रावणी सोमवार निमित्ताने महासिद्ध चिक्कवडियार, अमरसिद्ध देवाचे पुजारी धोंडप्पा अजावडियार, सिद्ध संप्रदायाचे पुरोहितकार तथा महादेव पुजारी, रमेश फुलारी, विठ्ठल पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते श्री अमरसिद्ध देवाच्या मुर्तीची महाअभिषेक, पूजाअर्चा, आराधना व विविध धार्मिक विधीने प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.तरी पंचक्रोशीतील भाविकांनी उपस्थित राहून श्री अमरसिद्ध देवाचे दर्शन आशिर्वाद तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन पंच कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

**सिद्ध परंपरा अख्यायिका**

गेल्या ९०० वर्षापासून मानकरी विठ्ठल पाटील परिवाराने श्री अमरसिद्ध देवाची पूजा-अर्चा अखंडितपणे करीत आहेत.सिद्ध परंपरेतील श्री महासिद्ध आणि गौरादेवी यांचे अमरसिद्ध, योगी मल्लप्पा, मळी मल्लप्पा वडिया आणि अवधूत वडिया आदी चार धर्म पुत्रांची अख्यायिका आहे. श्री अमरसिद्ध हे ब्रह्मचारी सिद्धपुरुष योगी असल्याने तपश्चर्येतून लोककल्याणकारी कार्य केल्याचे हे भक्तांच्या श्रद्धेतून दिसते.पुढे त्यांनी संजीवन समाधी घेण्यापूर्वी श्री अमरसिद्ध देवांनी गावातील पाटीलकी व वतनाचा अधिकार विठ्ठल पाटील यांच्या पूर्वजांकडे सोपविल्याचे सांगण्यात येते.तेव्हा पासून आजतागायत मानकरी पाटील परिवाराने श्री अमरसिद्ध देवाची पूजा-अर्चा परंपरेने चालू ठेवली आहे. पहिल्या व शेवटच्या श्रावणी सोमवारी, दीपावली, गुढीपाडवा व दोड्डहब्बा आदी महत्त्वाच्या दिवशी श्री अमरसिद्ध देवाची मूर्ती श्री महासिद्ध मंदिरात दर्शनासाठी आणली जाते.

# जनहिताला केंद्रस्थानी ठेवून विकासकामांना गती- सभापती संस्कृती सातपुते



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा करून जनहिताला केंद्रस्थानी ठेवून विकासकामांना गती देण्याचा माणस समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये केला. तसेच या सभेत जिल्ह्याच्या विकासकामांचा आढावा घेत विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली.

ही सर्वसाधारण सभा जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली.

यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार, शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण सभापती सौ. अमृताताई वाघे, गटनेत्या रश्मीताई बागल, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीनकर, प्रशासकीय अधिकारी स्मिता पाटील यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.